# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of kidnaped children**

**Police Station** :- **AHTU Washim**

**Date of Good Work done** :- **28/03/2023**

**Brief of the work done :-**

02 अपहृत बालिकांचा शोध घेण्यास AHTU_Washim कक्षास यश ; 03 वर्षांपासून प्रलंबीत प्रकरणाचा लावला छडा.

लोकमत

३ वर्षांपासून प्रलंबित प्रकरणाचा छडा : कर्जत, मुंबईतून आरोपी ताब्यात

## दोन अपहृत बालिकांसह फरार आरोपींना पकडले!

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** गत तीन वर्षांपासून अपहरणाच्या प्रलंबित प्रकरणातील दोन अपहृत बालिका व आरोपींचा शोध घेण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षास यश आले आहे. एका आरोपीस कर्जत (जि. रायगड), तर दुसऱ्या प्रकरणातील आरोपीस तळोजा कॅम्प, मुंबई येथून ताब्यात घेत पीडित बालिकांना कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले.

जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलिस स्टेशन हद्दीतील पळवून नेलेल्या मुलींचा शोध व तपासावर दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या गुन्ह्यांचा तपास करून आरोपींचा शोध घेण्यासाठी अशी प्रकरणे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, वाशिम यांच्याकडे वर्ग केली जातात. मागील ३ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या दोन अपहरणाच्या गुन्ह्यातील अपहृत बालिका व आरोपींचा शोध घेण्यात आला.

कारंजा ग्रामीण पोलिस स्टेशन येथे भादंवि कलम ३६३ मधील तीन वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीस कर्जत (जि. रायगड) येथून ताब्यात घेत पीडितेची सुटका करून तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. दुसऱ्या प्रकरणात मंगरूळपीर पोलिस स्टेशन येथे भादंवि कलम ३६३ मधील आरोपीस तळोजा कॅम्प, मुंबई येथून ताब्यात घेत पीडितेस तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. सन २०२० पासून तपासावर प्रलंबित असलेले दोन्ही गुन्हे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, वाशिमच्या पथकाने उघडकीस आणले असून, आरोपींवर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलिस अधीक्षक बच्चन सिंह, कारंजाचे उपविभागीय पोलिस अधिकारी जगदीश पांडे यांचे मार्गदर्शनाखाली ,लिस उपनिरीक्षक स्वाती इथापे कर्मचारी रजनी सरकटे, संदीप निखाडे उज्ज्वला गायकवाड, रेखा कांबळे यांनी पार पाडली.

### गतवर्षी १२ गुन्हे उघडकीस

प्रलंबित प्रकरणातील अपहृत बालिका किंवा अन्य व्यक्ती तसेच आरोपींचा शोध घेण्यासाठी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष वाशिमच्या पथकाकडून वेळोवेळी कारवाईची मोहिम राबविली जाते. गतवर्षीसुद्धा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, वाशिम यांनी उत्कृष्ट तपास करत वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले १२ गुन्हे उघडकीस आणले होते.





३ वर्षांपासून अपहरणाच्या प्रलंबित प्रकरणातील २ अपहृत बालिका व आरोपींचा शोध घेण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षास यश आले. सुजाण नागरिक या नात्याने अपहरण किंवा अशा प्रकारची कोणतीही तक्रार असल्यास नियंत्रण कक्षास माहिती द्यावी. संबंधितांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

**- बच्चन सिंह**, पोलीस अधीक्षक, वाशिम

### तिघांना पालकांच्या स्वाधीन केले

**वाशिम :** कोणालाही न सांगता घरातून निघून गेलेल्या दोन अल्पवयीन मुले व एका मुलीस वाशिम ग्रामीण पोलिस स्टेशनच्या चमूने परत आणून सोमवारी पालकांच्या स्वाधीन केले. वाशिम ग्रामीण पोलिस स्टेशन येथे दोन वेगवेगळ्या प्रकरणात भादंवि कलम ३६३ नुसार गुन्हे दाखल होते. या गुन्ह्याचा तपास वाशिम ग्रामीण पोलिस करीत असताना अल्पवयीन मुले ही भोईवाडा पोलिस स्टेशन मुंबई येथे असल्याची माहिती प्राप्त झाल्यावरून ठाणेदार सपोनि प्रमोद इंगळे यांनी तत्काळ एक चमू भोईवाडा, मुंबई येथे रवाना केली. कायदेशीर कार्यवाही करून अल्पवयीन मुलांना ताब्यात घेत वाशिमला परत आणले. पालकांना बोलावून या अल्पवयीन मुलांना पालकांच्या ताब्यात दिले. ही कारवाई पोलिस अधीक्षक बच्चन सिंग, उपविभागीय पोलीस अधीकारी सुनिलकुमार पुजारी, कर्मचारी प्रशांत अंभोरे, मोहन गवळी, मीनाक्षी गोटे यांनी पार पाडली.